# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११६०४/२१/अ.क्र.४४८/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११६०७/२१/अ.क्र.४४९/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११६०८/२१/अ.क्र.४५०/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११६०९/२१/अ.क्र.४५१/२५/०१**

**श्री. यशवंत भास्कर कदम**
रुम नं १, नानू बावरे चाळ,पाटकर कंपाऊंड,
तुळशेतपाडा, गावदेवी रोड, भांडूप (प).
मुंबई ४०००७८

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ००२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ००२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०२.२०२० | ०२.०३.२०२० | २७.११.२०२० | २८.१२.२०२० |
| १३.०२.२०२० | २४.०२.२०२० | २७.११.२०२० | २८.१२.२०२० |
| १३.०२.२०२० | २४.०२.२०२० | २७.११.२०२० | २८.१२.२०२० |
| १३.०२.२०२० | २४.०२.२०२० | २७.११.२०२० | २८.१२.२०२० |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.०२.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "ट्रेंचेस कामासंबंधित" माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०२.२०२० व दि. ०२.०३.२०२० "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल", असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. २७.११.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "संबंधितांचे पत्र असमाधानकारक असून योग्य दखल घेऊन माहिती देण्यात यावी. अद्याप माहितीस निरिक्षणाची संधी दिलेली नाही. त्यामुळे योग्य दखल घ्यावी", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर "अपीलार्थीस १५ दिवसाचा कालावधी पुन्हा एकदा अभिलेखावर उपलब्ध असलेल्या माहितीचे निरिक्षण करण्याची संधी दयावी. अपीलार्थी यांनी निवड केलेली माहिती शुल्क आकारुन देण्यात यावी", असे आदेश पारित केले आहे.

तदुनंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. ३१.०३.२०२१ रोजी "संबंधित विभागात माहितीसाठी हेलपाटे मारुन देखील तसेच सहाय्यक अभियंता (परि.) श्री. प्रमोद वाघमारे यांना माहितीसाठी वारंवार भेटून माहिती दिली नाही. विलंब केला आहे. निरिक्षण देत नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणात संबंधित अभियंत्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यात यावी ही मा. आयोगास विनंती", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग यांचे प्रतिनिधी श्री. संजय ढगे, दुय्यम अभियंता (परि.) सी विभाग उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, सदर चारही प्रकरणांतील माहिती ही सन २०१९-२०२० च्या कालावधीतील असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग यांनी अवलोकन करण्यासाठी अपीलार्थी यांना सूचित केले होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे सदर प्रकरणी कलम ७(१) चा भंग होत आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन "अपीलार्थीस १५ दिवसाचा कालावधी पुन्हा एकदा अभिलेखावर उपलब्ध असलेल्या माहितीचे निरिक्षण

करण्याची संधी दयावी. अपीलार्थी यांनी निवड केलेली माहिती शुल्क आकारुन देण्यात यावी", असे आदेश पारित करुन प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, सदर प्रकरणातील माहिती सन २०१९-२०२० या कालावधीतील असून अपीलार्थी यांना सद्य:स्थितीत माहिती प्राप्त करुन घेण्यास कोणताही स्वारस्य नाही. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेले जोडपत्र-अ व ब हे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कालावधीत सादर केले असल्यामुळे यावर कोणतीही प्रक्रिया होऊ शकली नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. सदर माहिती सॉफ्ट कॉपी मध्ये उपलब्ध असल्यास तर अपीलार्थी यांना तात्काळ विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

मा. मुख्य माहिती आयुक्तांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्राधिकरणांना दि. २९.०४.२०२५ रोजी निर्देश देण्यात आले की, सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे सर्व माहिती अधिकार अर्ज आणि सदर अर्जांना देण्यात आलेले उत्तर व माहिती (माहिती अधिकार कायदा अंतर्गत सूट असलेल्या ठिकाणी वगळता) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर नागरीकांना सुलभरितीने शोधता येईल अशा पद्धतीने शोध सुविधा (key word search) देऊन स्वयंप्रेरणेने प्रकट करावी.

तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहीत मुदतीत माहिती प्रदान करणे बंधनकारक आहे. सदर माहिती सन २०१९-२०२० या कालावधीतील असून माहिती देण्याचा कालावधी उलटून गेला आहे. अपीलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्याचा कोणताही स्वारस्य नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्यात यावी. तसेच सदर माहिती सॉफ्ट कॉपीमध्ये उपलब्ध असल्यास तर अपीलार्थी यांना सॉफ्ट कॉपीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नमूद कालावधीच्या तरतुदीचे काटेकोर पालन करावे. या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Maharashtra

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**